(Marathi)

1043/9/91

1336 11 P

1336 Mar

देशाचा पालनवाला हें पद शिवाजीचा पोवाडा

(संपादक नामदार जाधव) या पुस्तकांतील घेतलें आहे.

# प्रभात फेरी.

Prabhat-Pheri, Pt 3.

## ॥ ३ ॥

Marathi

### बॅरिस्टर–गांधी.

2 copies



प्रिं. प.–पी बी. पाटक, पां. वै. प्रेस, मुंबई ४.

–किंमत १ आणा–

स्वराज्य--नौबद झडूं लागली हर हर० ॥ १ ॥
फुकट बोलणे टाकुनि द्यावे । सज्ज तुम्ही व्हावें ॥
इंग्रज करिचें राज्य तूमचें । हिसकुनि तुम्हि घ्य वें॥
छी थू तुमची जगीं होतसे । गमत न ताजेला ! ॥
काळीं ठिक्कर मुखें जाहलीं । लढा मुक्त व्हाव याला॥
झुंजा अरिशीं रणमख मांडा । मांडा जोरानें ॥
दुर्हा मोडुनी कुटा अरिला । खंबिर मनसानें ॥
उठा मर्द हो वेळ पातली । स्वराज्य रवि आला॥
उदया चलितो दिसूं लागला । अरि धरि भीतीला।
लज्जेस आर्यभूच्या रक्षणे लज्जेस पूर्वजांच्या ॥
शूरवीर हो रणीं ठाकुंया । छातीवर अरिच्या ॥
चला मर्द हो एक होउनी । स्वराज्य घ्यायाला ॥
स्वराज्य-नौबत झडूं लागली हर हर० ॥ २ ॥
क्रिश्चन भाई, पारशि भाई, मुसलमान भाई ॥
हिंदभूमिचे सुत हे सारे । हिंदभू आमुची आई ॥

सुपुत्र आम्ही मिडवुनि खांद्रा जाउं लढायाला ॥
मुक्त करूं माय आमुची । सोडुनि द्वैताला ॥
राष्ट्र-मुखाचा कलंक धुउनी टाकूं या आतां ॥
अरिरुधिराचा तिलक लावुनी रक्षूं गोमाता॥
जाउं या संगरा झडकरिहो राष्ट्रीय मंगलाला॥
टाकूनि रणशौर्यातें आ ण मिरवुं विजयमाला॥
संगर-तांडव घोर करूनी स्वराज्य घ्यायाला ॥
स्वराज्य-नौबद झडूं लागली : हर हर० ॥ २ ॥

मिटास पट्टी इनकमपट्टी डोईला पट्टी ॥
कि ी पट्ट्या पोशिति नौकरशाही ती लठ्ठी ॥
हिंदभूमि हा पिळूनिनेता सर्वांचे संपत्ती ॥
तयामुळें ही सर्व पसरली दारिद्र्यापत्ती ॥
शस्त्र न लाठी आम्हां हातीं धरण्या ते देती ॥
अशस्त्र ऐशा आम्हांला ते खुशाल बडवीती ॥
लाज न त्यांना भूतदयेची। रावणी राज्य त्यांचें ॥

# प्रभात फेरी ॥ ३ ॥

## ॥ हर हर महादेव बोला ॥

प्रभात--भूपाळी ( चाल—वनश्याम सुंदरा० )

प्रभात--फेरी वदे हिंदूना अरुणोदय झाला ॥
स्वातंत्र्याचा मंत्र 'हर हर महादेव' बोला॥धृ०॥
प्रभात आली उठा हिंदुहो । कार्य करायाला ॥
स्वातंत्र्याचा विजय-शब्द तो हर हर महादेव बोला
धाय मोकली हिंदभूमि । ही बद्ध असे झाली ॥
लोह श्रृंखलीं गुलाम गिरीच्या । तिला बांधियेली॥
हिंद बंधुहो तिच्या सुतांनो । गुलाम तुम्हि झालां॥
लाज केवढी तुम्हां जगीं ही । षंढ तुम्ही बनलां ॥
मुक्तता आर्यभूची झडकरि आंग्ल-करांतुनि व्हावा
राष्ट्रध्वज हा करीं घेऊनियां ज ऊं फडकवाया ॥
उठा मर्द व्हा टाकुनि निद्रा प्रभात हा झाला ॥

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1336
Date 11.1.72
GOVT. OF INDIA

IMPERIAL RECORD
RECEIVED
21 NOV. 1939
DEPARTMENT

नको आम्हां तें मोडुनि पाडूं जुवाड परवशतेचें ॥
सोडुनियां आळस फुंकावें तुम्हि रण शिंगाला ॥
लढावयाला निघा झडकरी। वराया विजयमाला॥
सौमित्राचे वदणें ऐका चला लढायाला ॥
स्वराज्य-नौबद झडूं लागली। ' हर हर० ॥ ३ ॥

पद--( आनंदाचा कंद )

उठा बंधुनो चला झडकरि। क्षत्रियबाणा प्रगटकरा ॥ धृ० ॥ सत्वरतेनें--एक जुटीनें। संग्रामाची वाट धरा ॥ बहु दिवसाची--परदास्याची। बेडी तोडण्या पुढें सरा ॥ देशासाठीं धर्मासाठीं। स्वस्थ न बसतां रणि मरा ॥ श्री शिवबाची--तानाजीची। कर्तबगारी मनीं स्मरा। आपण त्यांचे वंशजसाचे। विचार हा तुम्हीं करा जरा ॥ महात्माजींचा स्वातंत्र्याचा। लढा बंधुनो आहे बरा ॥ शस्त्र न घेतां--आहे आतां लढण्याचा हा मार्ग बरा ॥ शंकर कविचे बोल हिताचे पक्के ध्यानी मनीं धरा ॥

# देशाचा पालनवाला.

देशाचा पालनवाला तो शिवाजी राजा झाला॥
धर्माचा रक्षणवाला तो शिवाजी राजा झाला.॥
त्रिभुवनांत डमरू ज्याचे । नादतांच नंदी नाचे॥
जो परित्राण या भूचे । शंकर भोला ॥ १ ॥
गर्जते भवानी मेधा । चमकते भवानी खांडा ॥
चाललाच भगवा झेंडा । रण–नाचाला ॥ २ ॥
तुकयाचा प्रेमळ वीणा । गहिंवरवीं अंतःकरणा॥
करुणेच्या घेउनि ताना । उठवी हरिला ॥ ३ ॥
प्रभु रामदास तो आला । राष्ट्राचा जादूवाला ॥
मावळा मंत्रिला सगळा । भालेवाला ॥ ४ ॥
रणयज्ञ–विजय--हेरंबा । पूजाया रणजगदंबा ॥
तोरणा रण--प्रारंभा । नारळ फुटला ॥ ५ ॥
त्या चंद्रराव मोऱ्याला । दास्याच्या सरदाराला॥
भूमीच्या मूर्त न काला । जाळा जाळा ॥ ६ ॥
तो विजापूरचा कोल्हा । वाघास दावि वागूरा॥

वरि वाघनखीं तरवारा । दिसे न त्याला ॥ ७ ॥
खिंडींत शत्रुचे बाण । निज मरणावर तोलून ॥
त्राणांत भूप झेलून । बाजी पडला ॥ ८ ॥
पु‍ऱ्यांत राजवाड्यांत । खड्गाची रात्र कुजबुजत
ऐकूनि मस्त शाइस्त । पळुनी गेला ॥ ९ ॥
तो पुरंदरचा झगडा । ते मुरारबाजी लढला
हाताच्या करुनी ढाला । रिपु रोधीला ॥ १० ॥
तो औरंग्या दिल्लींत । शिवपवन धरी डावांत
परि पवन डाव उडवीत । उडुनी गेला ॥ ११ ॥
मग सिंहगडाचें युद्ध । गड चढला वैभवसूर्य ॥
रक्ताचें देउनि अर्घ्य । तान्हा गेला ॥ १२ ॥
किती असे वीर वर्णावे । किति जणा पवाडे गावे ॥
कवितेनें ओवाळावें । कुणा कुणाला ॥ १३ ॥
श्रीस्वातंत्र्याची माला । वीरांनीं गुंफुनि विमला ॥
अर्पिली देश--देवाला । हर हर बोला ! ॥ १४ ॥
वैकुंठ रायगड केला । लोक तो देवगण बनला ॥
शिवराजा विष्णू झाला । वंदन त्याला ॥ १५ ॥

## स्वदेश गीत

प्रिय भगिनींनो विनती करीतसे स्वदेश प्रीती मनीं धरा। सोडुनी द्या तुह्मीं हौस मनींची देशी कंकणे करीं भरा॥ राष्ट्र गुरु हे महात्माजी सांगती ऐसे सकलाला। धंदा आमुचा सर्व बुडाला कठीण काळ हा आजि आला॥ दारिद्र्यानें बहुत पीडिले अन्न नसे हो पोटभरी। ऐसे असतां फयशन तुह्मीं कां सोडाना अजुनी तरी॥ विलायती हे सुंदर खासे मोह पाडिते बहुत मना। नाना परिनें भुल-वुनी तुह्मां पिळुनी नेई सर्व धना॥ कामधेनु सम मातृ भूमिही अगणित येथें धान्य पिके। विला-यते मध्यें कसे चालले हिंदी मरती सर्व भुके। कांच देऊनि सुवर्ण नेती भुलवुनी तुह्मां परोपरी। गाजी ह्मणोनी पाजी करीती सावध व्हाना अजुनि तरी॥ वीर माता वीर कांता होऊनी गेल्या बहुत परी। अहिल्याबाई जिजा लक्ष्मी सांगु अशा या किती तरी॥ त्या देशामधिं तुह्मीं जन्मला आठ-

वण ह्याची मनीं धरा । बहिष्कार हे व्रत अचरोनी मातृभूमीला पुनीत करा ॥ राष्ट्राच्याही माता तुम्हीं बोलती ऐसे सर्व जनीं । उदासीन कां अजुनि असतां लागा कार्या वेगानीं ॥ प्रापंचीही श्रम बहु तुम्हां विश्रांतीहि मुळीं नसे । त्यांतच लवपळ वेळ काढोनि सुत काढाहो थोडेसे ॥ थेंबे थेंबे वर्षुनि घन बहु पोषण करितो सर्वांचें । अगणित युवती सूत काढितां कार्य होई बहु देशाचें ॥ क्षुद्र बुद्धि हे जाती मत्सर यासी थारा देऊं नका । स्वधर्म पाळा बहु प्रीतीनें परधर्मासि निंदु नका ॥ कंठ रवानें बाळ टिळक हे सांगुनि ऐसें सकळांला । स्वराज्यास्तव श्रमुनि भागुनि गेले हो वैकुंठाला ॥ अल्पमती मी विनति करितसे सर्व भगिनिनों क्षमा करा । त्याज्य असे ते टाकुनि द्या तुम्हीं ग्राह्य असे ते मनीं धरा ॥ गौरिनंदना विघ्ननाशना सुबुद्धि देई सकळाला । विनायकाची कन्या मागे अखंड तव पद देई मला ॥

# सिंहगड-पोवाडा

भाग १-२-३-४ सचित्र, किमत ६ आणे.

सवलतीची किमत ४ आणे.

तिकीट आगाऊ पाठविणें व्ही. पी. ने मागणी करूं नये.

# सुधारणेचा चुटका.

## भाग १-२-३-४, किंमत १ आणा.

पांच आण्याची तिकीटे पाठवावी म्हणजे वरील दोन्ही पुस्तके पाठवूं. व्ही. पी. नें मागणी करूं नये.

## पी. बी. पाठक आणि कंपनी.

श्री पांडुरंग वैभव बुक डेपो,

माधवबाग व सूर्यमहाल मुंबई नं. ४.